**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

**व्यवस्थापन परिषदेच्या तेहतिसाव्या सभेचा कार्यवृत्तांत**

**शुक्रवार, दि.२९ एप्रिल, २०११ सकाळी ११:०० वा.**

**व्यवस्थापन परिषदेची तेहतिसावी सभा शुक्रवार, दि.२९/०४/२०११ रोजी सकाळी ११:०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बंडगर बी. पी. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. सूर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ३) | प्रा. डॉ. पाटील टी. आर. | सदस्य |
| ४) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन. - संचालक, म. व वि. वि. मंडळ | सदस्य |
| ६) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ७) | डॉ. सूर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ८) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ९) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| १०) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ११) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| १२) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| १३) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १४) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १५) | डॉ. साळुंखे डी. जे. - परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १६) | डॉ. पुजारी डी. डी. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १७) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी. कुलसचिव | सचिव |

**अनुपस्थिती :**

मा. डॉ. बी. बी. कदम यांनी दूरध्वनीद्वारे या सभेस अनुपस्थित रहाणार असल्याचे कळविले त्याची नोंद घेण्यात आली.

**स्वागतः**

मा.कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ]** **दि.१७ मार्च, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव :** **दि.१७ मार्च, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ २ ]** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

**ठराव :** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ३ ]** **शै.वर्ष २०११-१२ पासून नवीन पारंपारिक महाविद्यालये सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर महाराष्ट्र शासन निर्णय क्रं महाराष्ट्र शासन निर्णय क्रं एनजीसी २०१०/(१९३/१०)मशि४ दि. ३०.१०.२०१० नुसार केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

(टिपणी: शै.वर्ष २०११-१२ पासून विद्यापीठाकडे सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे नवीन पारंपारिक महाविद्यालये सुरु करण्याबाबत विविध संस्थांकडून प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. सदर प्रस्तावांबाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्रं क्रं एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि. ३०.१०.२०१० नुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर शासन निर्णयातील अनु क्रं १ ते १.१५ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून मुददा क्रं १.१६ नुसार सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज मंजूरीच्या शिफारशीसह विद्यापीठाकडून शासनाकडे पुढील कार्यवाहीस्तव दि.०१ मे २०११ पर्यंत सादर करावयाचे आहेत. सदर कार्यवाहीची नोंद महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्यावतीने मा.कुलगुरु महोदयांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये घेतलेली आहे.

सबब शै.वर्ष २०११-१२ पासून नवीन महाविद्यालये सुरु करण्याबाबत संस्थांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर महाराष्ट्र शासन निर्णय क्रं एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि. ३०.१०.२०१० नुसार केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठराव :** **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**
**कला विद्याशाखेच्या तक्त्यामध्ये अ.क्र. १ मध्ये "जि. पुणे" ऐवजी "जि.सांगली" अशी टंकलेखनीय दुरुस्ती करावी.**

**[ ४ ] शै.वर्ष २०११-१२ पासून संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन अभ्यासक्रम / विषय , विद्याशाखा व अतिरीक्त तुकडया सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर महाराष्ट्र शासन निर्णय क्रं महाराष्ट्र शासन निर्णय क्रं एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि. ३०.१०.२०१० नुसार केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

(टिपणीः शै.वर्ष २०११-१२ पासून विद्यापीठाकडे सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन अभ्यासक्रम / विषय, विद्याशाखा व अतिरीक्त तुकडया सुरु करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. सदर प्रस्तावांबाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्रं एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि. ३०.१०.२०१० नुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर शासन निर्णयातील अनु क्रं १ ते १.१५ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून मुददा क्रं १.१६ नुसार सर्व पात्र अर्जदार संस्थांचे / महाविद्यालयांचे अर्ज मंजूरीच्या शिफारशीसह विद्यापीठाकडून शासनाकडे पुढील कार्यवाहीस्तव दि.०१ मे २०११ पर्यंत सादर करावयाचे आहेत. सदर कार्यवाहीची नोंद महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्यावतीने मा.कुलगुरु महोदयांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये घेतलेली आहे.

सबब शै.वर्ष २०११-१२ पासून संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन विषय / अभ्यासक्रम, विद्याशाखा व अतिरीक्त तुकडया सुरु करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर महाराष्ट्र शासन निर्णय क्रं एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि. ३०.१०.२०१० नुसार केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ५ ] शै.वर्ष २०११-१२ पासून नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर महाराष्ट्र शासन निर्णय क्रं महाराष्ट्र शासन निर्णय क्रं एनजीसी २०१०/(१९३/१०)मशि ४ दि. ३०.१०.२०१० नुसार केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

(टिपणीः शै.वर्ष २०११-१२ पासून विद्यापीठाकडे सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करण्याबाबत विविध संस्थांकडून प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. सदर प्रस्तावांबाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्रं क्रं एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि. ३०.१०.२०१० नुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. सदर कार्यवाहीची नोंद महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्यावतीने मा.कुलगुरु महोदयांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये घेतलेली आहे.

सबब शै.वर्ष २०११-१२ पासून नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करण्याबाबत संस्थांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर महाराष्ट्र शासन निर्णय क्रं एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि. ३०.१०.२०१० नुसार केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ६ ] शै.वर्ष २०११-१२ पासून संलग्नित महाविद्यालयांकडून ए.आय.सी.टी.ई अंतर्गत असणारे नवीन अभ्यासक्रम / विषय , विद्याशाखा व अतिरीक्त तुकडया सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर महाराष्ट्र शासन निर्णय क्रं एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि. ३०.१०.२०१० नुसार केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

(टिपणी: शै.वर्ष २०११-१२ पासून विद्यापीठाकडे सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे संलग्नित महाविद्यालयांकडून ए.आय.सी.टी.ई अंतर्गत नवीन अभ्यासक्रम / विषय, विद्याशाखा व अतिरीक्त तुकडया सुरु करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. सदर प्रस्तावांबाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्रं एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि. ३०.१०.२०१० नुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. सदर कार्यवाहीची नोंद महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्यावतीने मा.कुलगुरु महोदयांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये घेतलेली आहे.

सबब शै.वर्ष २०११-१२ पासून संलग्नित महाविद्यालयांकडून ए.आय.सी.टी.ई अंतर्गत नवीन विषय / अभ्यासक्रम, विद्याशाखा व अतिरीक्त तुकडया सुरु करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर महाराष्ट्र शासन निर्णय क्रं एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि. ३०.१०.२०१० नुसार केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ७ ] शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासुन विद्यापीठात स्कुल ऑफ कॉमर्स ॲन्ड मॅनेजमेंट स्टडीज अंतर्गत सुरु करावयाच्या मास्टर ऑफ कॉमर्स (M.Com.) या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ठरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी :- दि.१७/०३/२०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेतील विषय क्र.१३ वरील ठरावा-नुसार शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून विद्यापीठात स्कूल ऑफ कॉमर्स अन्ड मॅनेजमेंट स्टडीज अंतर्गत मास्टर ऑफ कॉमर्स (M.Com) हा दोन वर्षाचा अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदरच्या ठरावात प्रवेश क्षमतेचा अंतर्भाव नसल्याने प्रवेश क्षमता ठरवण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासुन विद्यापीठात स्कुल ऑफ कॉमर्स ॲन्ड मॅनेजमेंट स्टडीज अंतर्गत सुरु करावयाच्या मास्टर ऑफ कॉमर्स (M.Com.) या अभ्यासक्रमाची ६० प्रवेश क्षमता ठेवण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ८ ]** **मा. वरिष्ठ अधिक्षक, पोस्ट ऑफीस, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी पोस्ट ऑफीस करीता सोलापूर विद्यापीठाच्या इमारतीमध्ये ३०० चौ. फूट जागा मागणीचे पत्र मंजूरीस्तव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी : मा. वरिष्ठ अधिक्षक, पोस्ट ऑफीस, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी कार्यालयीन पत्र क्र. ए१/इएसटी/ओपनिंग ऑफ एस.ओ./सोलापूरयुनिव्हर्सिटी/११ सोलापूर दि.०९/०३/२०११ अन्वये पोस्ट ऑफीस सुरु करणे करीता मागणीबाबतचे पत्र विद्यापीठास दिलेले आहे.

सबब, मा. वरिष्ठ अधिक्षक, पोस्ट ऑफीस, सोलापूर विभाग, सोलापूर यांना पोस्ट ऑफीस सुरु करण्याकरीता सोलापूर विद्यापीठाच्या इमारतीमध्ये पोस्ट ऑफीस करीता ३०० चौ. फूट जागा देण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः** **मा. वरिष्ठ अधिक्षक, पोस्ट ऑफीस, सोलापूर विभाग, सोलापूर यांना विद्यापीठ इमारतीमध्ये पोस्ट ऑफीसकरीता ३०० चौ.फूट जागा देण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ९ ]** **विद्यापीठातील वर्ग १, २, ३ व ४ च्या शिक्षकेत्तर पदांवर कार्यरत कर्मचा-यासाठी सर्वसाधारण नियमावली, पदनिहाय कामाची कर्तव्ये व जबाबदा-या व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी : विद्यापीठातील वर्ग १, २, ३ व ४ शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकरिता सर्वसाधारण नियमावली, पदनिहाय कामाची कर्तव्ये व जबाबदा-यांच्या या संदर्भातील मसूदा तयार करण्यात आलेला आहे.

विद्यापीठातील वर्ग १, २, ३ व ४ च्या शिक्षकेत्तर कर्मचा-यासाठी सर्वसाधारण नियमावली, पदनिहाय कामाची कर्तव्ये व जबाबदा-या व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव :** **विद्यापीठातील वर्ग १, २, ३ व ४ च्या शिक्षकेत्तर पदांवर कार्यरत कर्मचा-यासाठी सर्वसाधारण नियमावली, पदनिहाय कामाची कर्तव्ये व जबाबदा-या यांना मान्यता देण्यात आली तसेच ही नियमावली संलग्नित महाविद्यालयासही लागू करण्यास मान्यता देण्यात आली.**

## मा.कुलगुरु यांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय :

**[१०(१)] शैक्षणिक वर्ष २०११ - १२ साठी सत्रारंभ व सत्र समाप्तीच्या तारखांना व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा.कुलगुरु महोदयांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये दिलेली मान्यता माहितीस्तव.**

(टिपणी :- सोबत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक संकुले यांच्या करीता शै.वर्ष २०११-१२ साठी सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा ठरविण्यासाठी दि. ०७.०२.२०११ रोजी मा.संचालक, मविविमं यांच्या अध्यक्षतेखाली मा.अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा व मा.संचालक, सर्व शैक्षणिक संकुले यांची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत खालील प्रमाणे सत्रारंभ व सत्र समाप्तीच्या तारखा निश्चित करुन सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांना दि.२६.०४.२०११ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केले असता विद्या परिषदेने ठराव क्रं ७६ अन्वये सदर तारखांना मान्यता देवून महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३० २ ( r ) अन्वये व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेल्या आहेत.

| विद्याशाखा | प्रथम सत्र | | द्वितीय सत्र | |
|---|---|---|---|---|
| | प्रारंभ | समाप्ती | प्रारंभ | समाप्ती |
| अ) कला, वाणिज्य, विज्ञान, सामाजिक शास्त्रे, विधी, (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील संकुले) | १३ जून २०११ | २३ आक्टोंबर २०११ | २० नोव्हेंबर २०११ | ३० एप्रिल २०१२ |
| आभियांत्रिकी, तांत्रिक, आर्किटेक्चर, फार्मसी, व्यवस्थापन अभ्यासक्रम एम.बी.ए., एम.एस.डब्ल्यू इ. (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील संकुले) | १ जुलै २०११ | ३० नोव्हेंबर २०११ | २ जानेवारी २०१२ | २३ मे २०१२ |
| शिक्षणशास्त्र, (बी.एड.बी.पीएड., एम.एड.,एम.पीएड., एम.ए एज्युकेशन इ.पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील संकुले) | १ जुलै २०११ | ३० नोव्हेंबर २०११ | २ जानेवारी २०१२ | २३ में २०१२ |

**टीपः सत्रारंभ व सत्रसमाप्तीच्या तारखांमध्ये महाविद्यालयास बदल करता येणार नाही.**

सत्रारंभाच्या दिवशी महाविद्यालयाची साप्ताहिक सुट्टी किंवा सार्वजनिक सुटटी येत असल्यास त्याच्या दुस-या दिवशी सत्रारंभास सुरूवात करावी. सत्र समाप्तीच्या दिवशी महाविद्यालयाची साप्ताहिक सुट्टी किंवा सार्वजनिक सुटटी येत असल्यास त्याच्या अगोदरचा दिवस सत्र समाप्तीचा दिवस राहील.

विद्या परिषदेच्या शिफारसीनंतर सदर तारखांना व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेऊन शै.वर्ष २०१०-११ च्या सत्र समाप्तीपूर्वी ( ३० एप्रिल २०११ पूर्वी ) शै.वर्ष २०११-१२ च्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा संलग्नित महाविद्यालये व शैक्षणिक संकुले यांना कळवणे आवश्यक होते.

तथापि व्यवस्थापन परिषदेची सभा दि.२९.०४.२०११ रोजी विद्यापीठात आयोजित करण्यात आली आहे व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेचे ठराव प्राप्त होण्यास वेळ लागतो . त्यास्तव दि.३०.०४.२०११ पूर्वी उपरोक्त सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक संकुले यांना कळविण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये उपरोक्त सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांना व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता दिलेली आहे.

सबब मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने उपरोक्त केलेली कार्यवाही माहितीस्तव.

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[१०(२)]** **परीक्षांच्या विविध कामाच्या मानधनात वाढ करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव.**

(टिपणी- सोलापूर/शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांनी त्याचे पत्र जा.क्र एसयुटीए/४६/२०१०, दिनांक २.११.२०१० या पत्रान्वये परीक्षेच्या विविध कामाच्या मानधनात ५० टक्के इतकी वाढ करण्याबाबतची विद्यापीठास विनंती केली आहे. सोलापूर विद्यापीठाच्या स्थापनेपासून परीक्षेतील विविध प्रकारच्या कामासाठी शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यासाठी ज्या दराने मानधन आदा केले जात होते, त्याच दराचा अवलंब करुन परीक्षा कामाचे मानधन विद्यापीठाकडून आदा करण्यात येत होते. त्यानंतर गतवर्षी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या मानधनामध्ये ५ ते १० टक्के इतकी वाढ करुन त्यानुसार मानधन देय करण्यात आलेले आहे.

तथापि, जून २०१० पासून नव्याने सुरु करण्यात आलेल्या सत्र पध्दतीमध्ये ५० गुणांच्या पेपरसेटिंगचे काम करणाऱ्या प्राश्निकांना व सदर परीक्षेचे काम करणाऱ्या क्लार्क यांना परीक्षा मंडळाच्या दि.०३/०३/२०११ रोजी झालेल्या सभेमध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

| ठराव क्र. १५ | परीक्षेच्या विविध कामाच्या मानधनात खालीलप्रमाणे वाढ करण्याचे ठरले. | | | |
|---|---|---|---|---|
| | अ.क्र. | पदनाम | पूर्वीचे मानधन | सुधारित मानधन |
| | ०१ | पेपर सेटर (५० मार्कांच्या पेपरसाठी) | ८२.५०/- Per Set | १००/- |
| | ०२ | क्लार्क (प्रतिदिन) | रु.७०/- | ८०/- |

वरीलप्रमाणे परीक्षामंडळात ठराव झाला असून सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुनश्चः मान्यतेस्तव).

**ठराव :** **परीक्षांच्या विविध कामाच्या मानधनात वाढ करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेल्या कार्यवाहीस शै. वर्ष २०११-१२ पासून खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.**

| **अ.क्र.** | **पदनाम** | **पूर्वीचे मानधन** | **सुधारित मानधन** |
|---|---|---|---|
| ०१ | पेपर सेटर (५० मार्कांच्या पेपरसाठी) | ८२.५०/- Per Set | १००/- |
| ०२ | क्लार्क (प्रतिदिन) | रु.७०/- | ८०/- |

**[१०(३)]** **उत्तरपत्रिका मुल्यमापनात सत्र पध्दतीच्या ५० गुणांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यमापन करताना प्रतिदिन उत्तरपत्रिकेची संख्या किमान व कमाल ही मर्यादा ठरविणे व सुधारित मानधन याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव.**

(टिपणी- सोलापूर विद्यापीठाने जून २०१० पासून बी.ए. भाग-१, बी.कॉम. भाग-१, बी.एस्सी. भाग-१ व एम.ए., एम.कॉम भाग-१ या अभ्यासक्रमासाठी सत्र पध्दतीचा स्विकार केलेला आहे. व पुढील परीक्षेपासून उर्वरित व्दितीय वर्ष व जून २०१२ पासून तृतीय वर्षासाठी सत्र पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे सर्व अभ्यासक्रमाकरिता सत्र परीक्षेचा स्विकार केल्याने १०० गुणांच्या ऐवजी ५० गुणांचा प्रश्नपत्रिका संच तयार करण्यात येत आहे. १०० गुणांच्या उत्तरपत्रिकेचे मुल्यमापन मर्यादा प्रतिदिन किमान ४० व कमाल ६० आहे व त्यासाठी पदवीस्तरावर (बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी.) मुल्यमापनासाठी रु.६/-प्रति उत्तरपत्रिका व पदव्युत्तर स्तरावर (एम.ए., एम.कॉम. व एम.एस्सी.) रु९/- प्रति उत्तरपत्रिका इतके मानधन देण्यात येते. सदर बाब विचारात घेता उत्तरपत्रिकेचे मुल्यमापन आता १०० गुणांऐवजी ५० गुणांचे करावे लागणार असल्याने ५० गुणांच्या उत्तरपत्रिकेचे मुल्यमापन करताना गुणांचा विचार करता उत्तरपत्रिकेची संख्या प्रतिदिन किमान व कमाल मर्यादा व सुधारित मानधन ठरविण्याची बाब विषय क्र.१६ अन्वये दि.०३/०३/२०११ रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या विचारार्थ ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. १६ | सत्र पध्दतीच्या ५० मार्कांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन प्रतिदिन किमान ५० व कमाल ८० इतकी मर्यादा करुन उत्तरपत्रिका तपासणीचे मानधन खालीलप्रमाणे मंजूर करण्यात यावे असे ठरले. |

| अ.क्र. | अभ्यासक्रम | उत्तरपत्रिका मार्कस् | शिफारस केलेले मानधन प्रति उत्तरपत्रिका |
|---|---|---|---|
| ०१ | पदवी | ५० | ५/- |
| ०२ | पदव्युत्तर | ५० | ६/- |

वरीलप्रमाणे परीक्षा मंडळात ठराव झाला असून सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुनश्चः विचारार्थ).

**ठराव :** **उत्तरपत्रिका मुल्यमापन व मानधनाबाबत परीक्षा मंडळाची शिफारस स्विकारुन खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.**

**सत्र पध्दतीच्या ५० मार्कांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन प्रतिदिन किमान ५० व कमाल ८० इतकी मर्यादा करुन उत्तरपत्रिका तपासणीचे मानधन खालीलप्रमाणे मंजूर करण्याबाबतची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

| **अ.क्र.** | **अभ्यासक्रम** | **उत्तरपत्रिका मार्कस्** | **शिफारस केलेले मानधन प्रति उत्तरपत्रिका** |
|---|---|---|---|
| **०१** | **पदवी** | **५०** | **५/-** |
| **०२** | **पदव्युत्तर** | **५०** | **६/-** |

**[१०(४)] मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडील संचालकांची कमाल मानधन मर्यादा शिथिल करण्याबाबत तसेच कंत्राटी तत्वावर नेमलेल्या सुरक्षारक्षकाचे मानधन ठरविण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी- मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडील संचालक यांच्या सुधारीत मानधनाबाबत धोरणात्मक निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या दि. १८ जून २०१० च्या बैठकीतील ठराव क्र. २५(६) अन्वये घेण्यात आला. सदरच्या निर्णयात रु.१५,०००/- इतक्या मानधनास मान्यता देण्यात आली.

मध्यवर्ती मूल्यमापन केद्राकडे निरनिराळया वर्गाच्या पेपर मुल्यांकनाचे काम चालू असते. त्यामुळे परीक्षा कामाच्या व्यापकतेमुळे मूल्यमापनाच्या कालावधीत वाढ होत होती. त्यामुळे संचालकाची अंतिम मानधन मर्यादा रु.१५,०००/- शिथिल करुन घेण्याची बाब दि.३/३/२०११ च्या परीक्षा मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आली होती.

तसेच मूल्यमापन केद्राकडे ५०,००० इतक्या मर्यादेपर्यंत उत्तरपत्रिकेची तपासणी करुन घेण्यासाठी खालील प्रमाणे मनुष्यबळांची आवश्यकता अनिवार्य आहे.

| अ.क्र. | पदनाम | संख्या | मानधन (प्रतिदिन रु.) |
|---|---|---|---|
| १) | सुरक्षारक्षक | एक | १२५/- |

| | |
|---|---|
| ठराव क्र. १८(०२) | मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडील संचालकांच्या मानधनाची कमाल मर्यादा रु.१५,०००/- वरुन रु.२०,०००/- पर्यंत वाढविण्याची शिफारस करण्यात आली तसेच सुरक्षारक्षकास रु.१२५/- प्रतिदिन मानधनाची शिफारस करण्यात आली. |

वरीलप्रमाणे परीक्षा मंडळात ठराव झाला असून सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ पुनश्चः सादर).

**ठराव : मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडील संचालकांची मानधन मर्यादा व कंत्राटी तत्वावर नेमलेल्या सुरक्षारक्षकाचे मानधन ठरविण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.**
**मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडील संचालकांच्या मानधनाची कमाल मर्यादा रु.१५,०००/- वरुन रु.२०,०००/- पर्यंत वाढविण्यात आली तसेच सुरक्षारक्षकास रु.१२५/- प्रतिदिन मानधन मान्य करण्यात आले.**

**[ १०(५) ] सोलापूर विद्यापीठाच्या सध्याच्या ३५ एकर व नव्याने भूसंपादित झालेल्या ४८२ एकर परिसरास नाव देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठाच्या सध्याच्या ३५ एकर व नव्याने भूसंपादित झालेल्या ४८२ एकर परिसरास नाव देण्याबाबत व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे यांनी विनंती केली आहे.

सबब, विद्यापीठाच्या सध्याच्या ३५ एकर व नव्याने भूसंपादित झालेल्या ४८२ एकर परिसरास नाव देण्याची बाब विचारार्थ).

**ठराव : सोलापूर विद्यापीठाच्या सध्याच्या ३५ एकर परिसरास "विद्याविहार" व नव्याने भूसंपादित केलेल्या ४८२ एकर परिसरास "ज्ञानतीर्थनगर" असे नाव देण्यात यावे असे ठरले.**

**अभिनंदनाचे ठराव:**

१) मा.कुलगुरु यांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार मिळाल्याने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.

२) मा. प्राचार्य डॉ. आर. एन. शेंडगे संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांना प्रा. द. ता. भोसले पुरस्कार मिळाल्याने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.

३) प्रा. डॉ. तुकाराम पाटील यांची पुणे विद्यापीठाच्या हिंदी विभागाच्या विभागप्रमुखपदी नियुक्ती झाल्याने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.

४) विद्यापीठाचे पॅनल ॲडव्होकेट श्री. गिरीश एस. गोडबोले यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदी निवड झाल्याने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.

५) डॉ. अशोककुमार ई. एन. यांना भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्याकडे सादर केलेल्या "Conservation, Livelihoods and Development: A Study on Great Indian Bustard Wildlife Sanctuary (Nannaj in Solapur District, Maharashtra State)" प्रकल्पाकरीता एकूण रु.४,८२,६७५/- इतके अनुदान मंजूर झाल्याने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे**
**सचिव, व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**डॉ. बा. पां. बंडगर**
**अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद**